# जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी

# कोव्हीड-१९ अंतर्गत कंत्राटी पदभरती

## जाहीरात

कोव्हीड-१९ अंतर्गत जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी अधिनस्त Dedicated COVID Hospital, Dedicated COVID Health centre येथे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील करार तत्वावर पुढील नमुद पदांसाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | वय | अनुभव | पदसंख्या | पदस्थापना | एकत्रित एकूण मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Specialist General Medicine | 1)MBBS with Post Graduate Degree (MD in Medicine )from Institution recognized by Medical Council of India 2) Desirable: DM or equivalent in Endocrinology or Cardiology | Up to 50 years or Retired Govt Servant – age upto 62 years | 1years' experience of working as a specialist in a hospital will be prefered. | 02 | Dedicated COVID Hospital Dedicated COVID Health centre | 75,000/- (From COVID Fund) and Rs. 25,000/- From CSR fund by Hon.Collector Office |

**१) सुचना :**

१)वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२)सदरची भरती प्रक्रिया स्थगित करणे अथवा पूर्णपणे रद्द करण्याचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवलेले आहेत.

३)वरील पदांना कोणतेही इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

४)निवड झालेल्या उमेदवाराला प्रथम तीन महिने कालावधीकरीता किंवा कोव्हीड साथ संपेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणुक दिली जाईल.

५)निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

६)निवड झालेल्या उमेदवारांना समितीने तयार केलेल्या अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील तसेच रु.१००/- च्या बॉण्डपेपरवर करारनामा सादर करावा लागेल.

७)जाहीरातीत नमुद पदे व पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

८)वरीलप्रमाणे जाहीरातीदवारे रिक्त जागी उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त जोवर उमदवार निवड होईपर्यंतर केली जाईल.

९)महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.पीएचडी/३००११/१७९/२०१४-आ-७ दि. ०८ जुलै २०१५ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई अंतर्गत सर्व कंत्राटी पदांना सामाजिक आरक्षण लागू केलेले आहे.

**१०)उपरोक्त जाहीरातीद्वारे उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदभरती पूर्ण होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक गुरुवारी दु.४:०० ते ६:०० या वेळेत walk in interview द्वारे उमेदवार पदभरती करणेत येईल.**

**(२) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती –**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे

२) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला.

३) अनुभवाची प्रमाणपत्रे

४) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो

५) जात प्रमाणपत्रची सांक्षाकिंत प्रत

६) जात वैधता प्रमाणपत्र

३) **अर्ज करण्याची पध्दत :-**

१)इच्छुक व पात्र उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यात A4 आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एका बाजुस टंकलिखीत अथवा मुद्रीत करुन सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज सादर करावा.

२)अर्जाचा समावेश असलेल्या लिफाफयावर वरील बाजुस ठळक अक्षरात **भिषक पदाकरीता अर्ज** (COVID-19) पदाकरीता अर्ज असे नमुद करण्यात यावे. परिपुर्ण अर्ज, जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दहा दिवसाच्या आत खालील पत्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा टपालाने पोहचतील अशा रितीने पाठविण्यात यावे. विहित मुदती नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तव्दतच पोस्टाच्या दिरंगाईमुळे अर्ज प्राप्त होण्यास उशिर झाल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**मा.जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी ता.जि.रत्नागिरी पि.को.४१५६१२.**

३)उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर ओळखपत्राच्या आकाराचे स्वतःचे अलिकडील काळातील छायाचित्र चिकटविणे आवश्यक आहे.

४)उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता वय याबाबतच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे . असे न केल्यास अर्ज अपुर्ण समजुन तडकाफडकी नाकरण्यास योग्य समजला जाईल. तसेच उमेदवाराने अर्जासोबत कोणत्या प्रमाणपत्राच्या मुळ प्रती जोडु नये.

४) **सदोष अर्ज :-**

१) या जाहिरातीत दिलेल्या विहित नमुन्यानुसार नसलेले अर्ज.

२) अर्जावर स्वतःचे छायाचित्र नसल्यास.

३) सुवाच्च नसलेले, अपुर्ण किंवा चुकीची किंवा विसंगत माहिती भरलेले किंवा स्वाक्षरी नसलेले अर्ज.

४) विहित मुदती नंतर प्राप्त अर्ज.

५)एकापेक्षा जास्त पदासाठी केलेला एकच अर्ज.

६)विहित अर्हता धारण करीत नसलेले अर्ज.

५) **विशेष सूचना :-**

१)सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२)सदर जाहिरातीतील उल्लेख केलेली वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अटी संबंधित पदासाठी आवश्यक असलेली पात्रता दर्शवितात.

३)विहित नमुन्यानुसार / निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा आधिकार स्वतःकडे राखुन ठेवला असुन या संदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही. पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्यावर शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

४)पदभरतीची प्रक्रीया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

५)निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

सही/-

**जिल्हा शल्य चिकित्सक,**
**जिल्हा शासकिय रुग्णालय रत्नागिरी.**

## अर्जाचा नमुना

अर्जाचा नोंदणी क्रमांक
(जिल्हा रुग्णालयाच्या कार्यालयाने भरावयाचे)

(फोटोवर उमेदवारांची स्वाक्षरी)

प्रति,
मा.जिल्हा शल्य चिकित्सक,
रत्नागिरी

विषय – ................................पदाकरिता अर्ज.

१) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :- ..................................................

२) संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) : – ..................................................
..................................................
..................................................
..................................................

दूरध्वनी क्रमांक (असल्यास) :- ..................................................

३) जन्मतारीख :- तारीख महिना वर्ष

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

४) अर्ज करतेवेळीचे वय :- तारीख महिना वर्ष

५) जात व प्रवर्ग :-

६) लिंग :- पुरुष / स्त्री

७) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | अर्जदाराची शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण झालेल्या परीक्षांचा तपशिल | विदयालयाचे/परीक्षा मंडळाचे नाव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | घेतलेले भाषा विषय | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अ | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| ब | इतर शैक्षणिक अर्हता | | | | |

८) अनुभवाचा तपशिल :

| संस्था | पद | पासून | पर्यंत | एकुण वर्ष/महिने | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## उमेदवारांनी स्वाक्षरी करावयाचे प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, जाहिरातीतील सूचना मी काळजीपूर्वक वाचल्या आहेत. त्यानूसार मी वरील माहिती भरुन दिलेली आहे. अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे नोकरी गमावल्यास मी बाध्य राहिल व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही.

अर्जदाराची सही

ठिकाण :

दिनांक :

(नाव : )